MVP,Samaj's

**S.V.K.T. Arts, Science & Commerce College, Deolali Camp, Nashik**

## Department of History

## Best Practice

# Modi Script Course

## Goal

- To generate interest in Modi Script
- To create job opportunities
- Conservation of Modi Script
- To enable the learner to peep into log past documents

## The Context:

Modi was one of the most important script of medieval Maharashtra. Earlier in Maharashtra documents regarding land revenue , judicial, Justice, Donation of land ( Dan-patra) ,Religious matters, property matter , Jahangir, watan, Farman etc. were written in Modi. Research of these medieval documents is not possible without having proper knowledge of Modi script. Department of history has been conducting classes on Modi Script since 2017.

## The Practice:

Every year the Modi Script course is organised. Around 35 students are enrolled in this course. Mr.Kailas Tambe is an authorised Modi Script Teacher. Principal Dr. Vijay Medhane always encourages the History Department to conduct such programmes successfully.

## Evidence of Success:

1.Student learned & interpret Modi Script for Research purpose

2.Student able to understand the introduction of Modi Script, emergence and its use in history.

3.They learn the importance of Modi Script in Maratha history.

4.They developed the skill in interpreting Modi documents.

5.This course is open to all people of all age and professions could get benefit.






पुढारी

# मोडी लिपीचे जतन करा

## प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांचे प्रतिपादन

**देवळाली कॅम्प : वार्ताहर**

महाराष्ट्र तसेच मध्य भारतात प्रामुख्याने मोडी लिपीचा वापर केला जात असून, असंख्य शासकीय दस्तऐवज या लिपीमध्ये उपलब्ध आहेत. त्याचे वाचन अन् योग्य अर्थबोध होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी, इंग्रजीप्रमाणे मोडी लिपीचाही अभ्यास करायला हवा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी केले.

देवळाली कॅम्प येथील एसव्हीकेटी कॉलेज येथे मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर मोडी लिपीचे प्रशिक्षक कैलास तांबे, उपप्राचार्य डी. एस. शिंदे, उपप्राचार्या सुनीता आडके, माजी उपप्राचार्य के. के. हरक होते. प्राचार्य डॉ. विजय मेधणे पुढे म्हणाले की, शासकीय, ऐतिहासिक दस्तऐवज हे मोडी लिपीत आजही उपलब्ध आहेत. मात्र, त्याचे वाचन करण्याकरिता जाणकारांची संख्या हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. त्याचप्रमाणे दिवसेंदिवस जाणकारांचीही संख्या घटते आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोडी लिपीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रशिक्षक कैलास तांबे म्हणाले की, मोडी लिपी अवगत असेल तर अचूक माहिती मिळते. त्यामुळे योग्य दिशा मिळू शकते. इतिहास विभागप्रमुख डॉ. मंगला निकुंभ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सविता आहेर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. डब्ल्यू. पवार यांनी आभार मानले.

लिपी प्रशिक्षण वर्ग

देवळाली कॅम्प : मोडी लिपीबाबत जागृतीपर भाषण करताना प्राचार्य डॉ. विजय मेधणे. (छाया : संजय निकम)

My Nashik Edition
31 Aug, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com


देवळाली कॅम्प
इतिहास विभाग आयोजित
मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग
३० ऑगस्ट ते १० सप्टें. २०१८
प्रशिक्षक - प्रा. कैलास तांबे


Commerce College Deolali Camp
आयोजित
समारोप

संक्षिप्त



देवळाली कॅम्प : मोडी लिपी प्रशिक्षण समारोपाप्रसंगी प्राचार्य विजय मेधणे, प्रा. कैलास तांबे, प्रा. डॉ. व्ही. डी. कापडी व विद्यार्थी वर्ग. (छाया : संजय निकम)

## मोडी लिपी प्रशिक्षणाचा समारोप

**देवळाली कॅम्प :** विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत अर्धवेळ नोकरी, रोजगार शोधायला हवा. मात्र, त्यासाठी न्यूनगंड बाजूला ठेवणे आवश्यक आहे. मोडी लिपीचे ज्ञान किंवा अभ्यास केला तर रोजगाराची समस्या दूर होण्यास मदतच होईल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांनी केले. देवळाली कॅम्प येथील एसव्हीकेटी महाविद्यालयात मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचा समारोप बुधवारी झाला. प्राचार्य डॉ. विजय मेधणे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर मोडी लिपीचे प्रशिक्षक कैलास तांबे, उपप्राचार्या सुनीता आडके, डॉ. व्ही. डी. कापडी, इतिहास विभागप्रमुख डॉ. मंगला निकुंभ होते. विद्यार्थी रॉबिन आचार्य, किरण तुपे यांनी मोडी लिपीचे महत्त्व सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. एस. डब्ल्यू. पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. व्ही. डी. कापडी यांनी आभार मानले.


S.V.K.T. Arts Science & Commerce College Deolali Camp
इतिहास विभाग आयोजित
मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग समारोप


इतिहास विभाग आयोजित
मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग समारोप